# जिल्हाधिकारी कार्यालय,अकोला.

# वीज पडल्यास काय कराल?

अ ) घरामध्ये घ्यावयाची काळजी -

1.वीज व वादळापुर्वी संगणक , टेलीव्हीजन इ.उपकरणे बंद करुन स्त्रोतापासुण अलग करुन ठेवावीत.

2. शक्यतो दुरध्वनीचा वापर टाळावा.

3. वादळी वातावरणत विजेच्या उपकरणाचा वापर टाळावा.

4. घरामध्ये असतांना दारे व खिडक्या बंद करुन सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्या.

ब) घराबाहेर घ्यावयाची काळजी -

1. आकाशात वीज चमकल्यावर दहा सेंकदांनी मेघ गर्जनांचा आवाज आल्यास, तिथल्या अंदाजे तीन कि.मी.परीसरात वीज पडण्याची शक्यता समजावी.

2. शेतात काम करीत असाल तर जिथे आहा तिथेच रहापायाखाली लाकुड,कोरडा पालापाचोळा ठेवा,दोन्ही पाय एकत्र करुन गुडघ्यावर हात ठेवुन डोके जमिनीकडे झुकवा तथापि डोके जमिनीवर टेकवु नका.

3. झाडांखाली आश्रय घेऊ नये.

4.आपले वाहन वीजेचे खांब व झाडे यापासुण दुर ठेवुन सावकाश चालावे.

5. आपण एखादया मोकळया परिसरातअसल्यास,गुडघ्यामध्ये डोके घालुन खाली वाकुन बसावे.

6. धातुच्या वस्तु दुर ठेवाव्यात.

क) प्राथमिक उपचार -

वीज पडल्यास मुख्यतः मानवी ह्रदय व श्वसन प्रक्रियेत अडथळा येतो. विद्युतघात झाल्यास लगेच ह्रदयाजवळील भागाच्या परिसराला मालिश करावे. तोंडाने श्वसन प्रक्रियेस मदत करावी.

## आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम

## आपत्ती व्यवस्थापन कक्ष